कला अकादमी गोवा
पणजी–गोवा
कअ/काविवि/मनास्प/२०२५–२६/१७८४
दि.२८/१०/२०२५

**कृपया प्रसिध्दीसाठी**

कला अकादमी आयोजित यंदाच्या मराठी 'ब' गट नाटयस्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणा–या सर्व नोंदणीकृत संस्थांनी आपल्या प्रवेशिका दाखल करण्याची शेवटची तारीख दि. ३० ऑक्टोबर २०२५ ही असून सदर नाटयस्पर्धांचे नियम व अटी तसेच विहित नमुन्यातील प्रवेशिका कला अकादमीच्या स्वागत कक्षात विनामूल्य उपलब्ध आहेत. तसेच कला अकादमीच्या **www.kalaacademygoa.co.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

सदर स्पर्धेच्या सादरीकरणाचा अनुक्रम त्याचदिवशी म्हणजे दि. ३० ऑक्टोबर २०२५ सायं.५.00 वाजता कला अकादमीच्या कार्यालयात सर्व उपस्थित संस्था प्रतिनिधींच्या समक्ष चिठ्ठया टाकून ठरविण्यात येईल. त्यानंतर प्रवेशिका मागे घेण्यासाठी ५ दिवसांची मुदत असून या निर्धारित मुदतीनंतर प्रवेशिका मागे घेता येणार नाही. तरी या अंतिम मुदतीची नोंद घेऊन सर्व इच्छुक नाटयसंस्थानी आपल्या प्रवेशिका निर्धारित मुदतीत दाखल कराव्यात असे कला अकादमीतर्फे कळविण्यात आले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड
७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)